# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** माहुर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0142 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/08/2025 00:00

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 12/08/2025
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/08/2025
**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/08/2025 **Time (वेळ):** 23:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 040
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/08/2025 23:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय समोर माहुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजु नाना डुकरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पडसा,माहुर,माहुर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पडसा,माहुर,माहुर,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7066206889

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अम्रत श्रीरंग जगताप | | | 1. पारवेकरनगर,माहुर,माहुर,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.12/08/2025

पोलीस स्टेशन माहुर,

मी राजु नाना डुकरे, वय 47 वर्षे, व्यवसाय शेती, रा. पडसा ता. माहुर जि. नांदेड. मोबाईल क्रमांक 7066206889, आधार क्र. 708764237765.

मी समक्ष पोलीस स्टेशन माहुर येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 11/08/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड येथे तक्रार दिली की, माझे वाहन विक्री करण्याकरीता 100 रूपयाचा मुद्रांकवर शपथपत्र लिहुन घेण्याकरीता दिनांक 08/08/2025 रोजी तहसिल कार्यालय, माहुर गेटच्या समोर मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांच्याकडे जावून मी 100 रूपयाचे मुद्रांक मागितले. त्या करीता अमृत जगताप हे 120 रूपये दया असे सांगितले. मी गडबडीत असल्यामुळे व मला मुद्रांक पेपरची आवश्यकता असल्यामुळे मी त्यांना नाईलाजास्तव 120 रूपये देवून 100/- रूपयाचा मुद्रांक खरेदी केला. तसेच दि. 09/08/2025 रोजी मुद्रांक विक्रेते अमृत जगताप यांच्याकडे शेतकरी बचत कामाकरिता 100/- रूपयाचे दहा मुद्रांकची आवश्यकता असल्याने गेलो असता, त्यांनी माझेकडे प्रत्येक मुद्रांकामागे 20/- रूपये असे एकुण 200/- रूपये द्यावे लागतील असे म्हणाले. संबंधीत मुद्रांक विक्रेता अमृत जगताप हे 100/- रूपयाचे दहा मुद्रांक करिता माझेकडून प्रत्येक मुद्रांकमागे 20/- रूपये असे एकुण 200/- रूपये लाच दिल्याशिवाय मुद्रांक देणार नाही अशी माझी खात्री झाली आहे. मी मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांच्याकडे दि. 12/08/2025 रोजी मुद्रांक खरेदीकरिता जाणार आहे. त्यांनी मुद्रांक किंमती व्यतिरिक्त जास्त रूपये घेतली तर त्यांच्यावर कार्यवाही करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री तरकसे व पोलीस निरीक्षक श्रीमती अर्चना करपुडे यांनी माहिती घेतली की, मुंबई मुद्रांत विक्री व पुरवठा नियम 1934 मधील सुधारणा झाले बाबतचे उप नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.का/5/मु./प्र.क्र. 24/95/1471/1549, दि. 05/09/1995 मध्ये मुद्रांक विक्री मर्यादा 2000/- रूपयापर्यंत व मनौतीचे दर 3 टक्के निश्चित करणे बाबतचे पत्र प्राप्त केले. त्यानुसार कोणत्याही परवानाधारक बॉन्ड विक्रेत्याला शासनाकडून 100/- रूपयाचा स्टॅम्प हा 3 टक्के कमिशननुसार 97/- रूपयाला मिळत असतो. तो त्यांनी खरेदी करतांना शासनास 97/- रूपये देवून घ्यायचा आहे आणि तो विकतांना तो 100/- रूपयाला विक्री करायचा आहे. तरी यातील बॉन्ड विक्रेता अमृत जगताप यांनी शासनाने घालून दिलेल्या नियमांचा व अधिकाराचा अप्रामाणिकपणे वापर करून प्रत्येकी 100/- रूपये बॉन्डच्या मागे अधिकचे 20/- रूपयाची मागणी करून अन्यायाची प्राप्ती केली आहे अशी त्यांची खात्री झाल्याने त्यांनी लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई करण्याचे ठरवले.

माझे नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 12/08/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नांदेड येथुन सर्व सापळा पथक त्यांचे शासकीय वाहनाने माहुर शहरात सोनापीर दर्गा जवळ सुरक्षित ठिकाणी येवुन मला पोलीस निरीक्षक श्रीमती अर्चना करपुडे यांनी फोन करून तिथे बोलावुन घेतले. मी त्याठिकाणी गेल्यावर सापळा कार्यवाहीकामी उपस्थित पंच क्र 1) श्री. ज्ञानेश्वर गोविंदराव शिंदे, वय 53 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद ग्राम महसुल अधिकारी, नेमणुक तहसिल कार्यालय, नांदेड, 2) प्रदिपकुमार चांदोबा घाटे, वय 42 वर्षे, व्यवसाय नोकरी पद महसुल सहायक नेमणुक तहसिल कार्यालय, नांदेड यांची व सापळा पथकातील अंमलदार यांची मला ओळख करून दिली. त्यानंतर मी ला.प्र.वि. कार्यालयात लाच मागणी बाबत दिलेली तक्रार त्यांनी वाचून पाहिली व मला तोंडी विचारून, मी लेखी दिलेली व तोंडी सांगत असलेली तक्रार एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर दोन्ही पंचानी त्या तक्रारी अर्जावर स्वाक्षरी केली. ज्याच्यावर मी व पोलीस निरीक्षक श्रीमती करपुडे मॅडम यांनी अगोदरची स्वाक्षरी

केली होती.

माझे तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेवून मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरबाबत माहिती दिली. त्यानंतर पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांनी मला लाचमागणी पडताळणीबाबत योग्य त्या सुचना देवून माझेकडे डिजिटल व्हाईस रेकॉर्डर देवून पंच क्र. 1 श्री ज्ञानेश्वर शिंदे यांचेसह मला तहसिल कार्यालय माहुर गेटचे बाजुस मुद्रांक विक्रेते अमृत जगताप यांची भेट घेण्यासाठी रवाना केले. मी व पंच क्र. 1 असे मुद्रांक विक्रेते अमृत जगताप यांचेकडे गेलो. मुद्रांक विक्रेते अमृत जगताप हे त्याच परिसरातील असल्यामुळे व त्यांचे मुद्रांक विक्रीचे ठिकाणी त्यांचे नाव असल्याने मला त्यांचे नाव अमृत जगताप आहे हे माहित होते. मी त्याठिकाणी गेल्यावर त्यांना नमस्कार करून 100/- रूपयाचे दहा मुद्रांक बचत गटाकरीता खरेदी करायचे आहेत असे मी सांगितले. मुद्रांक विक्रेते अमृत जगताप यांनी 100/- रूपयाचे दहा मुद्रांक करीता 1200/- रूपये होत आहेत असे सांगितले. त्यामुळे मी त्यांना दहा मुद्रांक खरेदी करीत आहे, काही कमी करा असे म्हणल्याने, अमृत जगताप यांनी 1200/- रूपये ऐवजी 1150/- रूपये देण्यास सांगितले. मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांनी 100/- रूपयाचे दहा मुद्रांक करीता 1000/- रूपये होत असतांना त्यांनी मला 1150/- रूपये दहा मुद्रांकची किंमत सांगितली. त्यामुळे प्रत्येकी 100/- रूपयाचे बॉन्ड पेपरवर अधिकची 15/- रूपये प्रमाणे 10 बॉन्ड पेपरचे 150/- रूपये मागत असलेली रक्कम ही लाच होती हे मला कळाले. त्यानंतर मी अर्धा-एक तासांनी येवुन घेवुन जातो असे अमृत जगताप यांना सांगुन, मी व पंच क्र 1 तेथुन निघुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवून पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांना घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्यावेळी पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण ऐकले व पंच क्र. 1 यांच्याकडून मी सांगत असलेली हकीकत तसेच डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील संभाषण एकच असल्याची खात्री केली.

दिनांक 12/08/2025 रोजीच्या लाचमागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांनी 100/- रूपयाचे दहा मुद्रांक खरेदी करीता 1200/- रूपये सांगुन मी त्यांना काही कमी करा असे म्हणल्याने त्यांनी 1200/- रूपये ऐवजी तडजोडीअंती 1150/- रूपये देण्यास सांगितले. त्यात 150/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांनी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी मी सापळाकामी लागणारी 1150/- रू रक्कम पंच क्रमांक-2 यांचेकडे दिली. त्यानंतर पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांचे सुचनेवरून पो.कॉ. ईश्वर जाधव यांनी मला व दोन्ही पंचास अल्ट्रॉव्हायलेट लॅम्प व अँन्थ्रॉसिन पावडर बद्दल थोडक्यात माहिती देवून प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांनी सापळा कार्यवाहीबाबत दोन्ही पंचास, सापळा पथकास व मला आवश्यक त्या सुचना दिल्या व अँन्थ्रॉसिन पावडर लावलेली 1150/- रूपये रक्कम माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांनी मला योग्य त्या सुचना दिल्या व मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांनी लाच स्विकारल्यानंतर सापळा पथकास लाच स्विकृतीचा ईशारा करावा असे कळविले.

त्यानंतर 14.55 वाजता मी व पंच क्र. 1 असे मोटर सायकलने व सापळा पथक हे शासकिय वाहनाने आमचे मोटर सायकलचे पाठिमागे निघाले. मी व पंच क्र. 1 असे तहसिल कार्यालय माहुर जवळील मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांचे दुकानासमोर गेलो. मी मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांचेकडे जावुन 100/- रूपयाचे दहा मुद्रांकची मागणी केली. तेव्हा अमृत जगताप यांनी 100/- रूपयाचे दहा मुद्रांक व त्यांचे संबंधित रजिष्टरवर नोंदी करून मला 100/- रूपयाचे दहा मुद्रांक दिल्यामुळे मी त्यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान मागितल्याप्रमाणे 10 बॉन्डचे 1000/- रूपये व प्रत्येकी बॉन्डवर अधिकची रक्कम 15 रूपये लाच, याप्रमाणे एकुण 1150/- रूपये पंच क्र. 1 समक्ष त्यांच्यासमोर धरली. तेव्हा मुद्रांक विक्रेते अमृत जगताप यांनी 1150/- रूपये मोजुन त्यांचे जवळील नोटामध्ये ठेवुन सदर नोटा हे त्यांच्या टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवले. त्यावेळी मी सापळा पथकास लाच स्विकृतीचा ईशारा केला. तेव्हा सर्व सापळा पथक तेथे येवुन सापळा पथकातील पो.नि. श्रीमती अर्चना करपुडे यांनी पंच क्रमांक 1 यांना विचारणा केली असता पंच क्रमांक 1 यांनी मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांचेकडे हाताने इशारा करून दाखविले व त्यांनी लाचेची रक्कम त्यांचे टेबलचे ड्रॉवरमध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीस निरीक्षक अर्चना करपुडे मॅडम यांनी त्यांचा व त्यांचे स्टाफचा परिचय देवून मुद्रांक विक्रेते अमृत जगताप यांना त्यांचे नाव व पत्याबाबत विचारपुस केली. त्यानंतर पंच क्र. 2 यांनी लाचेची रक्कम मुद्रांक विक्रेता अमृत जगताप यांनी ठेवलेल्या ड्रॉवर मधुन काढली.

तरी अमृत श्रीरंग जगताप, वय 56 वर्षे, व्यवसाय मुद्रांक विक्रेता, रा. पारवेकर नगर, माहुर यांचे विरुध्द मी दिनांक 11/08/2025 रोजी ला.प्र.वि. नांदेड कार्यालयात दिलेल्या तक्रारी वरून दिनांक 12/08/2025 रोजी लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान मुद्रांक विक्रेता अमृत श्रीरंग जगताप यांनी पंचा समक्ष 100/- रूपयाचे दहा मुद्रांक खरेदी करीता 1200/- रूपयाची मागणी केली. मी त्यांना काही कमी करा असे म्हणाल्याने

त्यांनी 1200/- रूपये ऐवजी 1150/- रूपये देण्यास सांगुन सापळा कार्यवाही दरम्यान पंचा समक्ष 1150/- रूपये त्यांनी स्वतः स्विकारली. 1150/- रूपये मधील 150/- रूपये ही लाच रक्कम आहे. म्हणून मुद्रांक विक्रेता अमृत श्रीरंग जगताप, वय 56 वर्षे, व्यवसाय मुद्रांक विक्रेता, रा. पारवेकर नगर, माहुर यांनी शासनाने घालून दिलेल्या नियमाचा व अधिकाराचा अप्रामाणिकपण वापर करून प्रत्येकी 100/- रूपयाचे बॉन्डवर शासनाने नेमून दिलेल्या किंमतीपेक्षा अधिकचे 15/- रूपयाची मागणी करून अन्यायाची प्राप्ती केली आहे. त्यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही होणेसाठी माझी कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केला असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

GANESH VENKATRAO KARAD(I (Inspector)) / 151010004O2GVKM86017 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

F.I.R. प्रत मिळाली.

पोलीस ठाणे आर्मलदार
पो. स्टे. माहूर जि. नांदेड

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): GANESH VENKATRA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 15101000402GVKM86C